# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २६९/२०२४ दिनांक:- १९/०७/२०२४.

## "खुनाचा प्रयत्न करुन ०२ वर्षापासुन पसार झालेल्या आरोपीतास मध्यवर्ती गुन्हे शाखेकडुन अटक"

आचोळे पोलीस स्टेशन गुरनं । ३२४/२०२०, भादंविसंक ३०७,३२६,१४३,१४७,३२३,५०४,५०६ प्रमाणे दिनांक ०७/०७/२०२२ रोजी दाखल आहे. सदर गुन्हयातील फिर्यादी नामे श्री. आदर्श प्रशांत राय, वय-२२, रा. अे/१०२, माऊली कृपा, संखेश्वर नगर, आचोळे रोड, नालासोपारा पुर्व ता.वसई, जि.पालघर हे दिनांक ०६/०७/२०२२ रोजी २३.१५ वा. चे दरम्यान फिर्यादी हे मोटर सायकमध्ये पेट्रोल भरण्याकरीता जात असतांना नमुद गुन्हयातील आरोपी यांनी फिर्यादीचे मित्र इम्रान खान याचे घरा जवळ गैरकायदयाची मंडळी जमा करुन त्याचे दरवाजावर लाथा मारत असतांना दिसले म्हणून फिर्यादी हे विचारणे करीता गेले असता आरोपीने फिर्यादी याचा जीव घेण्याचे उद्देशाने त्याचे हातातील धारदार हत्याराने डोक्यात मारुन गंभिर जखमी केले होते.

मा. पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) यांनी आयुक्तालयाचे अभिलेखावरील शरीराविरुध्द, मालमत्ते विरुध्द गंभीर गुन्हे तात्काळ उघकीस आणणे बाबत सुचना दिल्या असल्याने प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. राहुल राख यांनी त्यांचे अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांना वरिष्ठांचे आदेशा प्रमाणे सुचना दिल्या होत्या.

सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे आफताब फारुक खान, वय-२१, हा गेले २ वर्षापासून आज पावेतो पोलीसांना मिळुन येत नव्हता व तो वारंवार शरीराविरुध्दचे गुन्हे करित होता. नमुद आरोपीताची परिसरात दहशत असल्याने त्याचे ठाव-ठिकाण्याबाबत माहित देण्यास समाजातून कोणीही पुढे येण्याचे धाडस करीत नव्हते करीता तो आज पोवेतो पोलीसांचे हाती लागत नव्हता.

मध्यवर्ती गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी पोउपनि विचारे व अंमलदार पोहवा राजाराम काळे, संतोष मदने, अकिल सुतार यांनी वरील गुन्हयाचा बारकाईने अभ्यास करुन, गुन्हयातील आरोपीता बाबत सखोल तपास करुन बातमीदारा मार्फत माहिती मिळवून आरोपी नामे आफताब फारुक खान, रा. रुम २०४,सुंदर अपार्टमेन्ट, संकेश्वर नगर, नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि. पालघर यास नालासोपारा येथून दिनांक १८/०७/२०२४ रोजी १८.०० वा.ताब्यात घेतले. त्याचे कडे अधिक तपास केला असता सदर गुन्हयाव्यतिरिक्त खालील गुन्हयात देखील तो पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

१) आचोळे पोलीस स्टेशन :- गुरनं । ३२४/२०२२, भादंविसंक ३०७,३२६,३२४,३२३,१४३,१४७,५०४,५०७, ४२७ प्रमाणे (पाहिजे आरोपी)
२) आचोळे पोलीस स्टेशन :- गुरनं । १४५/२०२३, भादंविसंक ३२४,३२३,१४३,१४७,५०४,५०६,४२७,३४ प्रमाणे. (पाहिजे आरोपी)

३) आचोळे पोलीस स्टेशन :- गुरनं । १२२/२०२४, भादंविसंक ३२४,३२३,५०४,५०६,४२७,३४ (गुन्हा उघकीस आणला आहे.)

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), व श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि. राहुल राख, सहा.पो.निरी/ नितीन बेंन्द्रे, दत्तात्रय सरक, पोउपनिरी/ हितेंद्र विचारे, सहाफौज/श्रीमंत जेधे, पोहवा/मनोहर तावरे, राजाराम काळे, संतोष मदने, अकिल सुतार, शिवाजी पाटील, गोविंद केंन्द्रे, संग्राम गायकवाड, हनुमंत सुर्यवंशी, राजवीर संधु, प्रविण पवार, अनिल नागरे, महेश वेल्हे, सतिष जगताप पोअं/ अंगद मुळे, नितीन राठोड, साकेत माघाडे, एमएसएफ/सचिन चौधरी यांनी केली आहे.

